हॅलो प्रभात

# विवेकानंद कॉलेजमध्ये प्रेरणादायी व्याख्यान संपन्न

कोल्हापूर : हॅलो प्रभात

येथील विवेकानंद कॉलेजमध्ये बी.एस्सी. कॉम्प्युटर सायन्स (एंटायर) विभागाच्या वतीने तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी 'Data Analytics and Visualization Using Qlik Sense' या विषयावर अतिथी व्याख्यानाचे यशस्वी आयोजन करण्यात आले.

व्याख्यानासाठी प्रमुख वक्ते म्हणून श्री. ओंकार कोकरे उपस्थित होते. त्यांनी आधुनिक युगात डेटा ॲनालिटिक्सचे वाढते महत्त्व, उद्योगविश्वातील त्याचा वापर तसेच डेटा व्हिज्युलायझेशनसाठी वापरल्या जाणाऱ्या विविध साधने व तंत्रे यांची सविस्तर माहिती दिली.

विशेष म्हणजे Qlik Sense या प्रगत प्लॅटफफॉर्मवर प्रत्यक्ष प्रात्यक्षिकाद्वारे त्यांनी संकल्पना स्पष्ट केल्याने विद्यार्थ्यांना विषय अधिक समजण्यास मदत झाली. या उपक्रमाचे आयोजन प्रभारी प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात, बी.एस्सी. कॉम्प्युटर सायन्स (एंटायर) विभागप्रमुख प्रा. पल्लवी देसाई तसेच प्रा. आर. आर. माने यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. या व्याख्यानाला विभागातील सर्व प्राध्यापक, विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना करिअरच्या दृष्टीने मार्गदर्शन मिळाले असून डेटा ॲनालिटिक्स व व्हिज्युलायझेशन या क्षेत्रातील नव्या संधींबाबत त्यांची दृष्टी अधिक व्यापक झाली आहे.

पुढारी बुधवार, १७ डिसेंबर २०२५




कोल्हापूर : बेळगाव येथे झालेल्या फिडे रॅपिड रेटिंग बुद्धिबळ स्पर्धेत कोल्हापूरच्या ऋषीकेश कबनूरकर याने विजेतेपद पटकावले.

# बुद्धिबळ : ऋषीकेश कबनूरकर अजिंक्य

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

बेळगाव येथील शास्त्रीनगर, गुजरात भवन येथे झालेल्या फिडे रॅपिड रेटिंग बुद्धिबळ स्पर्धेत ऋषीकेश कबनूरकर याने ९ व्या फेरीत ८ गुणांसह पहिल्या क्रमांकाचे २१,००० रुपये आणि चषक पटकविला. व्यंकटेश खाडे -पाटील याने तिसऱ्या क्रमांकाचे १०,००० रुपये पारितोषिक मिळवले. अशुमन शेवडेने ६ गुण मिळवून ११ वयोगटात बाजी मारली.

एआयसीएएफ आणि केएससीए यांच्या मार्गदर्शनाखाली बेळगाव जिल्हा बुद्धिबळ संघटनेच्या सहकायनि गिरिस्तुती चेकमेट स्कूल ऑफ चेसतर्फे १८ वर्षांखालील मुलांसाठी फिडे रॅपिड रेटिंग बुद्धिबळ स्पर्धा २०२५ आयोजित करण्यात आली होती. स्पर्धेत देशातील २७८ खेळाडूंनी भाग घेतला. यात १०२ फिडे मानांकित खेळाडू होते.

ऋषीकेश व व्यंकटेश हे अनुज अॅकॅडमी येथे सराव करत आहेत. ऋषीकेश स्वामी विवेकानंद महाविद्यालयाचा विद्यार्थी आहे. त्याला कार्याध्यक्ष अभयकुमार साळुंखे, सचिव शुभांगी गावडे, सी.ई.ओ. कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, जिमखाना विभाग प्रमुख डॉ. विकास जाधव, ज्युनिअर जिमखाना विभागप्रमुख प्रा. संतोष कुंडले, जिल्हा बुद्धिबळ असोसिएशनचे कृष्णात पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.